# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ३३१-२२** **दिनांक ०६/११/२०२२**

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात होणार ९९६ पदांकरीता पोलीस भरती.

राज्यातील सर्व जिल्हा पोलीस दल व आयुक्तालयामध्ये पोलीस शिपाई पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये देखील ९९६ पोलीस शिपाई पदांकरीता पोलीस भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. सदर पोलीस भरतीमध्ये ९८६ पोलीस शिपाई व १० चालक पोलीस शिपाई अशी एकुण पोलीस शिपाई भरती करण्यात येणार आहेत. सदर भरती प्रक्रियेतील आवेदनपत्र संगणकीय प्रणालीव्दारे दिनांक ०९/११/२०२२ ते ३०/११/२०२२ या कालावधीत स्विकारण्यात येतील याबाबतीत सविस्तर माहिती policerecruitment2022.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये मंजूर मनुष्यबळापेक्षा एक हजार पोलीस अमलदारांची पदे रिक्त असल्याने मोठया प्रमाणात मनुष्यबळाची कमतरता जाणवत होती. सदरच्या नवीन पोलीस भरतीमुळे आयुक्तालयातील पोलीस दलामध्ये ९९६ पोलीस अंमलदारांची भर पडून जनेतेच्या सेवमध्ये नवीन पोलीस अंमलदार सेवकरीता रुजू होणार आहेत. सदरची भरती पारदर्शकपणे पार पडण्याकरीता सर्व स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात येणार आहेत.

-------ooooo-------